## बदाम


***Prunus amygdalus*** Family – **Rosaceae**

**विविध भाषांमधील नावे:**
इंग्लिश: Almond, मराठी: बादाम

**Morphology:**
The almond (*Prunus amygdalus*, syn. *Prunus dulcis*) is a species of tree native to Iran and surrounding countries and ancient remains of almonds were discovered in the Levant area. The almond is also the name of the edible and widely cultivated seed of this tree. Within the genus Prunus, it is classified with the peach in the subgenus Amygdalus, distinguished from the other subgenera by corrugations on the shell (endocarp) surrounding the seed. The fruit of the almond is a drupe, consisting of an outer hull and a hard shell with the seed, which is not a true nut, inside. Shelling almonds refers to removing the shell to reveal the seed.



**वनस्पतीचे वर्णन:**
सुमारे ८ मीटर उंचीचा हा पानझडी वृक्ष मूळचा मध्य व पश्चिम आशियातील असून अद्याप तेथे वन्य अवस्थेत आढळतो. इ. स. पू. दहाव्या शतकात चीनमध्ये व इ. स. पू. पाचव्या शतकात ग्रीसमध्ये याची लागवड होती, असे म्हणतात. काहींच्या मते जरदाळू, सफरचंद, केळ व आंबा यांच्याप्रमाणे सु. ४,००० वर्षापूर्वीपासून मनुष्य त्याची लागवड करीत आला असावा. चरकसंहिता आणि सुश्रुतसंहिता यांमध्ये ‘वाताम’ नावाने बदामाचा उल्लेख आला आहे. बदाम मुळचा इराणातील असून तेथून तो इतरत्र नेला गेला आहे, असेही म्हणलेले आढळते. बदाम वृक्षाची साल करडी, पाने साधी, आयत-कुंतसम (भाल्यासाराखी), एका-आड-एक, चिवट, चकचकीत, व दातेरी असतात. फुले पांढरी, पण त्यावर तांबूस झाक असते. ती सुमारे २.५ से. मी. व्यासाची, आकर्षण असून कोवळ्या पालाविबरोबर किंवा पाने येण्यापूर्वी एकेकटी येतात. फुले व कच्ची फळे असताना हा वृक्ष सप्ताळूसारखा दिसतो. एकाट किंजदलापासून बनलेले, बिन देठाचे मोठे, ३-६ सेंमी लांब, अश्मगर्भी (आठळी फळ) काहीसे चपटे असते. त्यातील गर कठीण असून फळ पिकल्यावर ते तडकते व लांबट अंडाकृती, गर्द तपकिरी असे एकच बीज असलेली आठळी बाहेर पडते. पांढरी फुले, दुहेरी पुष्पमुकुट, विविधवर्णी पाने, लोंबती पाने इ. लक्षणांचे अनेक संकरज प्रकार उपलब्ध असून ते बागेत शोभेकरीताच लावले जातात.



**बहर येण्याचा कालावधी :** मार्च, एप्रिल आणि मे

**औषधी उपयोग:**
गोड्या प्रकारामधील कच्च्या व पक्व झालेल्या बदाम बिया खातात, त्यांची टरफले कडून, भाजून, टाळून, खारवून खाल्ल्यास अधिक चविष्ट लागतात. मिठाईमध्ये सोललेल्या बादाम बियांचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात. भारतात मिठाई, पक्वाने, तांबूल इत्यादीत बदामीचे कप घातले जातात. बदाम बी खूप पौष्टिक, शामक, उत्येजक, व तांत्रिक तंत्राच्या दृष्टिने पोषक असून देशी औषधात वापरले जाते. बिब्बा उतल्यास व्रणावर व गोम चावल्यास जखमेवर बी उगाळून लावतात.

**लागवड :**
भारतात सु. ७६०-२,४०० मीटर उंचीपर्यंत बदाम पिकवला जातो. त्याच्या लागवडीखाली २,४०० हेक्टर क्षेत्र असून त्यापासून ५,६०० क्विंटल बदामाचे उत्पादन होते. तसेच हिमाचल प्रदेशमध्ये २०० हेक्टरमध्ये पिक काढतात. उत्तर प्रदेशमध्ये डोंगराळ भागामध्ये सुमारे ५.००० हेक्टर मध्ये अक्रोड व बदाम यांची लागवड केली आहे. भारतात बियांपासून बहुतांश लागवड केली जाते. त्याकरिता जुलै-सप्टेंबर मध्ये जमवलेले बी डिसेंबरमध्ये पन्हेरीत पेरतात व वर्षानंतर रोपे बाहेर कायम जागी लावतात. याशिवाय कलमनीं ही निवडक वाणांची लागवड करतात. उन्हाळ्यात बदामाच्या झाडाला पाणी द्यावे लागते; कंपोस्ट खते व नायट्रोजनयुक्त दिल्यास उत्पादन अधिक येते.